www.sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व अॅडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • ९९ • RNI : MAHMAR/2023/87818 • गुरुवार दि.६ फेब्रुवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# आमदार सुरेश धस आधुनिक भागीरथ:खुंटेफळ साठवण तलाव प्रकल्पाचे लोकार्पण;मुख्यमंत्र्यांनी दिले दुष्काळमुक्तीचे आश्वासन

**बीड (वृत्तसंस्था)**

आमदार सुरेश धस यांच्या आष्टी मतदारसंघातील खुंटेफळ साठवण तलाव प्रकल्पाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले आहे. या लोकार्पण सोहळ्यानंतर आमदार सुरेश धस तसेच पंकजा मुंडे यांनी भाषण केले. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाषण केले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आमदार सुरेश धस यांचा उल्लेख करताना त्यांना 'आधुनिक भागीरथ' असे म्हटले आहे. तसेच या योजनेचे श्रेय मुख्यमंत्र्यांनी सुरेश धस यांना दिले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सर्वात आधी या प्रकल्पाला २०२२ मध्ये आमच्या सरकारने सुप्रमा दिली. या प्रकल्पाला ११ हजार कोटी रुपयांची सुप्रमा दिली आहे. कारण सुरेश धस एकदा मागे लागले तर ते डोके खाऊन टाकतात, हा शब्द चुकीचा असला तरी त्यांच्यामुळे आता हे काम अत्यंत वेगाने सुरू असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. धाराशिव जिल्हा आणि आष्टी तालुक्यात देखील मोठ्या प्रमाणात पाणी आपण आणणार असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे. या भागातला दुष्काळ आता भूतकाळ होणार आहे, असा विश्वास देखील मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. संपूर्ण परिसर हा बागायती झालेला असेल असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला.देवेंद्र फडणवीस म्हणाले, २०१४-१५ मध्ये दुष्काळाच्या काळात आपल्या सरकारने जलयुक्त शिवार योजना सुरू केली. या योजनेमुळे अनेक गावे पाणीदार झाली. उच्च न्यायालयाच्या समितीने देखील इतक्या वर्षात पहिल्यांदा भूजल पातळी वाढली असल्याचे सांगितले. मात्र, मराठवाड्याला कायम दुष्काळ मुक्त करायचे असेल तर जलसंधारणाच्या



कामाबरोबरच जोपर्यंत पश्चिम वाहिन्यांचे पाणी समुद्रात जाणारे पाणी गोदावरीच्या खोऱ्यात आणत नाही, तोपर्यंत मराठवाडा दुष्काळमुक्त होऊ शकत नाही.नदीजोड प्रकल्पाची मूळ संकल्पना बाळासाहेब विखे पाटील यांनी मांडली होती. ती संकल्पना पूर्ण करण्याचे काम आता त्यांचे सुपुत्र राधाकृष्ण विखे पाटील यांना मिळाले आहे. याचा आनंद असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे. नाशिक आणि नगर विरुद्ध उर्वरित मराठवाडा असा संघर्ष पाहायला मिळत आहे. तो संघर्ष देखील भविष्यात दूर होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, दोन राज्यांतर्गत नदी जोड प्रकल्पांना केंद्र सरकारच्या वतीने मदत केली जाते. मात्र आम्हाला राज्यांसोबत नाही तर आमच्या राज्यातच नदीजोड प्रकल्प राबवायचा आहे. त्याला देखील निधी देण्यास मान्यता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. मराठवाड्याला दुष्काळ मुक्त करण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. त्यामुळे आमची भावी पिढी दुष्काळ पाहणार नाही, असा विश्वास देखील फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. ही उपसा सिंचन योजना देखील सौरऊर्जेवर चालणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले आहे.देवेंद्र फडणवीस म्हणाले, ५३ टीएमसी पाणी हे जायकवाडी धरणामध्ये येणार आहे. या माध्यमातून मराठवाडा दुष्काळ मुक्त करण्यासाठी सरकार प्रयत्न करणार आहे. पुढील एका वर्षात नदी जोड प्रकल्पाचे काम सुरू होणार असल्याचे देखील फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

## संतश्रेष्ठ तुकाराम यांचे ११ वंशज हभप शिरीष महाराज मोरे यांनी आत्महत्या केली

**पुणे । प्रतिनिधी**

दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजी तिर्थक्षेत्र देहू गावातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. संतश्रेष्ठ तुकाराम यांचे ११ वंशज आणि प्रसिद्ध व्याख्याते हभप शिरीष महाराज मोरे यांनी आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. बुधवार सकाळी ८.३० च्या सुमारास शिरीष महाराजांचे मृतदेह घरात आढळून आले. त्यांनी गळफास घेत आपले जीवन संपविले, ज्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. शिरीष महाराजांचे अकाली निधन त्यांच्या कुटुंबीयांसाठी आणि भक्तांसाठी मोठा धक्का ठरला आहे.

त्यांचे पार्थिव शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात नेण्यात आले आहे. संध्याकाळी ४ वाजता देहू गावातील वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. शिरीष महाराज मोरे यांच्या निधनाने देहू गावावर दु:खाचा डोंगर कोसळला असून, त्यांच्याविषयी असलेल्या श्रद्धेचा आणि आदराचा भाव अनेक लोकांच्या हृदयात कायम राहील.



## शिवभोजन थाळी योजना पूर्ववत सुरू ठेवा:छगन भुजबळ यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र

**नाशिक**–राज्यातील गोर गरीब गरजू नागरिकांसाठी राज्यात सुरु करण्यात आलेली शिवभोजन थाळी योजना यापुढील काळातही पूर्ववत सुरू ठेवण्यात यावी अशी मागणी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम असलेली शिवभोजन थाळी ही योजना बंद केली जाणार असल्याची



चर्चा आहे. गरीब आणि गरजू नागरिकांसाठी शिवभोजन थाळी सुरु राहणे अत्यंत आवश्यक आहे.शिवभोजन थाळी उपक्रमामुळे भुकेलेल्यांना वेळेवर दोन घास मिळतात ही समाधानाची बाब आहे. शिवभोजनच्या दररोज २ लक्ष थाळीसाठी वार्षिक २६७ कोटी खर्च येतो आहे. शासनाच्या दृष्टीने भुकेलेल्यांच्या पोटासाठी २६७ कोटी हा खर्च तसा नगण्य आहे. त्यामुळे राज्यातील गरीब आणि गरजू नागरिकांचा सहानुभूतीपूर्वक पुनर्विचार करून शिवभोजन थाळी ही योजना पूर्ववत सुरु ठेवावी अशी मागणी छगन भुजबळ यांनी केली आहे.

# देवेंद्र फडणवीस बाहुबली तर मी शिवगामिनी:पंकजा मुंडे यांचे आष्टीत जोरदार भाषण;सुरेश धसांनाही लगावला टोला

**बीड**–आमदार सुरेश धस यांच्या आष्टी मतदारसंघातील खुंटेफळ साठवण तलाव प्रकल्पाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले आहे. या लोकार्पण सोहळ्यानंतर भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी भाषण केले आहे. यावेळी बोलताना त्यांनी आमदार सुरेश धस यांना मिश्किल टोला देखील लगावला आहे.

या जिल्ह्याचे आमदार ज्यांना २००९ मध्ये पहिला गुलाल लागला तो भारतीय जनता पक्षाकडूनच लागला ते आता पुन्हा २०२४ मध्ये आमदार म्हणून निवडून आले आहेत आणि ज्यांनी या सभेचे आयोजन करण्यासाठी मोठा सहभाग घेतला आहे ते म्हणजे सुरेश धस, असे म्हणत पंकजा मुंडे यांनी आमदार सुरेश धस यांचा उल्लेख केला आहे.

पंकजा मुंडे म्हणाल्या, देवेंद्र फडणवीस यांच्या बद्दल नेहमीच आदरभाव आहे. मात्र आज त्यांच्याबद्दल ममत्त्व भाव निर्माण होत असल्याचे पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे. आज फडणीसांना बाहुबली म्हणणारे पूर्वी मला शिवगामिनी म्हणत होते. त्यामुळे माझे वचनच माझे शासन आहे, असे देखील पंकजा यांनी म्हटले आहे. बोलणार एक आणि करणार एक हे माझ्या रक्तात नाही. मी गोपीनाथ मुंडे यांची लेक आहे. हे लक्षात ठेवा, अशा शब्दात मंत्री पंकजा मुंडे यांनी सुरेश धस यांना प्रत्युत्तर दिले आहे. सुरेश धस यांना मी आज देखील अण्णाच म्हणते, असं देखील पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे.दरम्यान, गोपीनाथ मुंडेंएवढा पहाडासारखा माणूस याच जिल्ह्याने महाराष्ट्राला दिल्याचेही सुरेश धस यांनी म्हटले. तसेच, शिरुर आणि पाटोदा तालुक्यासाठी आणखी ३.७ टीएमसी पाणी देण्याची मागणी केली. देवेंद्र बाहुबली हेच आमचं काम करु शकतात, तुमच्याकडूनच आम्हाला अपेक्षा आहे, असे म्हणत ही योजना मंजूर झाल्यास मी जिवंत राहिल किंवा नाही, पण या मतदारसंघातून भाजपचाच आमदार राहिल, असे आश्वासन आमदार सुरेश धस यांनी दिले आहे.



## कोकणच्या सर्वांगीण विकासासाठी अंबानी गृपचा मोठा पर्यावरण पूरक डिफेन्स प्रकल्प कोकणात आणणार

### उद्योगमंत्री उदय सामंत यांची घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई कोकण उद्योग परिषदेचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पाडला. यावेळी कोकणच्या विकासासाठी उद्योगमंत्री उदय सामंत यांनी कोकणाला चांगले दिवस येण्यासाठी निधीची व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले.



कार्यक्रमात जंगल संवर्धन, पर्यावरण माकड वानर आणि वन्य प्राणी समस्या, वने व पर्यावरण संवर्धनासाठी स्वायत्त कोकण समिती स्थापना, माकड व वन्य प्राणी समस्यांचे निवेदन, मत्स्यविकास, बंदर विकास व जल पर्यटनावर सत्र आयोजित करण्यात आले होते. उद्योगमंत्री उदय सामंत, शंभूराज देसाई, आणि पर्यटनमंत्री भरत गोगावले यांच्यासह प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन कोकण भूमी प्रतिष्ठानचे संस्थापक संजय यादवराव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी कोकणच्या विकासासाठी काय केले आहे आणि काय करायचं आहे याची माहिती दिली. कोकणात पर्यटन आणणे गरजेचे आहे. माझ्या विभागात अनेक लाभकारी योजना आहेत, त्यांचा लाभ कोकणवासीयांनी घेतला पाहिजे, असे ते म्हणाले.

आश्वासन देताना, तुम्ही स्वतः व्यवसाय करा. जागा विकू नका. आम्ही सर्व सहकार्य करू, असे गोगावले यांनी सांगितले. सामंत यांनी कोकणच्या विकासासाठी अंबानी गृपचा पर्यावरण पूरक डिफेन्स प्रकल्प आणि सेमी कंडक्टर प्रकल्प आणण्याची घोषणा केली. आम्ही कोकणाच्या विकासासाठी सदैव तत्पर आहोत आणि कधीहीतयार आहोत, असे ते म्हणाले.

## जिथे दिसेल तिथे ठेचा आणि गाडा:राहुल सोलापूरकरांवर उदयनराजे संतापले

**सातारा**–अभिनेता राहुल सोलापूरकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबाबत केलेल्या विधानावर छत्रपतींचे वंशज आणि खासदार उदयनराजे भोसले यांनीही संताप व्यक्त केला आहे. महापुरुषांबद्दल अशी विधाने करणाऱ्या लोकांना दिसेल तिथे ठेचले पाहिजे, असे टोकाची प्रतिक्रिया उदयनराजे यांनी दिली. या विकृतीची वाढ झाल्यास देशाच्या अखंडतेला धोका निर्माण होईल, असेही ते म्हणाले. राहुल सोलपूरकरने तसे विधान केले तर त्याला औरंगजेबाची औलादच म्हणायला पाहिजे, असा संताप उदयनराजे यांनी व्यक्त केला.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी आग्र्याहून सुटका करताना मुघलांना लाच दिली होती, असे विधान अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी केले होते. त्यानंतर त्यांच्याविरोधात राज्यात संतापाची लाट उसळली. राज्यभरातील शिवप्रेमींनी त्यांच्या या विधानाचा निषेध केला. ठाकरे गटाच्या वतीने त्यांच्या घरासमोर आंदोलनही केले होते. त्यात आता उदयनराजे भोसले यांनीही संताप व्यक्त केला आहे.अशा विधानामुळे मलाच नाही, तर अनेक शिवप्रेमींना वेदना होतात. हा राहुल सोलापूरकर म्हणजे कोण आहे? तो जो म्हणाला लाच. जे लाच घेतात यांना लाचपलिकडे काही समजत नाही. अशा लोकांच्या जीभा हासडल्या गेल्या पाहिजे. महापुरुषांबद्दल अशी विधाने करणाऱ्या लोकांना दिसेल तिथे ठेचले पाहिजे. वेचून ठेचले पाहिजे, अशी संतप्त प्रतिक्रिया उदयनराजे यांनी दिली. ही विकृतीची वाढ झाली तर देशाच्या अखंडतेला धोका निर्माण होईल. वेगवेगळ्या जातीधर्मात अशा विकृतांमुळे तेढ निर्माण होते, असेही ते म्हणाले.या विकृतीची वाढ झाल्यास देशाच्या अखंडतेला धोका निर्माण होईल. विकृत लोकांमुळेच वेगवेगळ्या जातीधर्मात तेढ निर्माण केले जातात. राहुल सोलपूरकरांबाबत मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन बोलणार आहे. महापुरुषांबाबत आक्षेपार्ह विधाने करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, त्यांच्यावर देशद्रोहाचा कायदा लागू केला पाहिजे, यासाठी मी अमित शहांची देखील भेट घेणार असल्याचे उदयनराजे म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आपण जपले नाही, तर देशाचे तुकडे व्हायला फार काळ लागणार नाही. विकृत विधाने करणाऱ्यांना थांबवले पाहिजे. त्यांचे सिनेमे बंद केले पाहिजे. निर्माते, दिग्दर्शकांनीही अशा लोकांनाही थारा देऊ नये, असे आवाहन उदयनराजे भोसले यांनी केले.


या लोकांना गाडले पाहिजे. त्यांना गाडले नाही तर देशाच्या अखंडतेचा प्रश्न आहे. कठोर शब्दात मी निषेध करतो. त्याला गोळ्या घालून मारले पाहिजे. त्यालाच नाही तर असे जे जे लोकं असतील त्या सर्वांना गोळ्या घातल्या पाहिजे. कुणीही बेताल विधाने करायचे. जीवाची पर्वा न करता शिवाजी महाराज पुढे गेले. अशा महापुरुषांबद्दल अशी विधाने होत असतील, तर दुसरा काही पर्याय नाही. तो जिथे दिसेल त्याला ठेचा आणि गाडा, असा संताप उदयनराजेंनी व्यक्त केला.आज आपण शिवाजी महाराजांची प्रतिमा देव्हाऱ्यात ठेवतो. का तर, बाकीच्यांनी साम्राज्य वाढवण्यासाठी लढाया केल्या. पण शिवाजी महाराज गोरगरीबांसाठी लढले. स्त्रीयांचे संरक्षण केले. परकीय आक्रमण थोपवले. अशा लोकांवर वेळीच आळा घातला नाही, तर आपल्या इतिहासाला वेगळे वळण देतील. कालांतराने शिवाजी महाराजांना वेगळे दाखवतील. असे ते म्हणालेत.

# महावितरणच्या योजनांना गती द्या–खा.नीलेश लंके यांची मागणी

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

महावितरण अंतर्गत सुरू असलेल्या केंद्र सरकारच्या आर.डी.एस.एस. योजनेसंबंधी खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय स्थायी उर्जा समितीच्या बैठकीत अत्यंत आग्रही मागणी केली. त्यांचं म्हणणं होतं की, या योजनांना गती दिली जावी, अन्यथा संबंधित ठेकेदाराला ब्लॅक लिस्ट करण्यात यावं.केंद्रीय अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर, खासदार श्रीरंग बारणे यांच्या अध्यक्षतेखाली उर्जा क्षेत्राविषयी चर्चा करण्यात आली. यावेळी खासदार लंके यांनी नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील महावितरणच्या विविध योजनांवर समितीचे लक्ष वेधले.खासदार लंके म्हणाले की, नगर दक्षिणमध्ये केंद्र सरकारच्या आर.डी.एस.एस. योजनेअंतर्गत १८६ फिडरच्या कामांची सुरूवात झाली आहे.

या योजनेंतर्गत वीज वितरण कंपन्यांच्या कार्यक्षमता सुधारणे, नुकसान कमी करणे, आणि विश्वासार्ह वीज पुरवठा सुनिश्चित करणे हे उद्दिष्ट आहे. मात्र, काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने यावर त्वरित लक्ष देण्याची आवश्यकता आहे.केंद्र शासनाच्या या योजनेअंतर्गत नगर जिल्ह्यात ३,३७४ कोटी रूपयांच्या कामांची मंजुरी देण्यात आली आहे. या कामांमध्ये वीज वितरण सुधारणा, स्मार्ट मिटरिंग आणि इतर उपक्रमांचा समावेश आहे. या कामांना केवळ १८ महिन्यांच्या आत पूर्ण करण्याचे उद्दीष्ट असले तरी, दोन वर्षांमध्ये केवळ १० टक्के काम पूर्ण झाले आहे.महावितरणच्या अधिक्षक अभियंत्यांच्या कार्यालयात आर.डी.एस.एस. योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला गेला आहे. कामे अत्यंत संथ गतीने चालल्याने खासदार लंके यांनी या ठेकेदार कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची मागणी केली.केंद्रीय निधीअंतर्गत कर्जत तालुक्यातील राजापुर, एरंडोली, पारनेर तालुक्यातील भाळवणी आणि नगर शहरातील सारसनगर व सावेडी या ठिकाणी सब स्टेशन प्रस्तावित आहेत. खासदार लंके यांनी या कामांना लवकर सुरू करुन ती गुणवत्तापूर्ण व दर्जेदार पार पडावीत, अशी मागणी केली.



# भद्रावती येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा रजत महोत्सव व पदाधिकारी मेळावा संपन्न

**भद्रावती । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचा रजत महोत्सव आणि पदाधिकारी मेळावा विदर्भातील असंख्य पदाधिकारी व सदस्यांच्या उपस्थितीत नुकताच थाटात संपन्न झाला. स्थानिक स्वागत सेलिब्रेशन सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे कार्याध्यक्ष निलेश सोमानी उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन भद्रावती-वरोरा विधानसभा क्षेत्राचे आमदार करण संजय देवतळे यांच्याहस्ते झाले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज आणि वृत्तसृष्टीचे आद्य जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमांना पुष्पमाला अर्पण करून दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रकाश देवतळे, वनप्रकल्प विभाग चंद्रपूरचे सहव्यवस्थापक स्वप्निल मरस्कोल्हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून भद्रावतीचे तहसीलदार राजेश भांडारकर, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आशुतोष






सपकाळ, वरोरा नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष अहेतेशाम अली, मानवाधिकार सहाय्यता संस्थानचे जिल्हाप्रमुख विनायक गरमडे, दैनिक महासागरचे जिल्हा संपादक प्रवीण बतकी, विदर्भ उपाध्यक्ष अनुपकुमार भार्गव, चंद्रपूर जिल्हाध्यक्ष पत्रकार शंकर बोरघरे, जिल्हा संघटक पत्रकार रुपचंद धारणे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमा दरम्यान पत्रकारितेची जबाबदारी, लोकशाहीतील पत्रकारितेचे महत्त्व आणि कायदा हा चौथा स्तंभ म्हणून कसा असावा याविषयी मान्यवरांनी पत्रकारांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा.महेश पानसे यांच्या वाढदिवसानिमित्त केक कापून त्यांचा सत्कार करण्यात आला. पत्रकार संघातर्फे नवनिर्वाचित आमदार करण संजय देवतळे यांचा शॉल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. पत्रकार संघाच्या तालुका अध्यक्षासह सदस्य व पदाधिकाऱ्यांचा त्यांच्या विशेष कार्याबद्दल संघटन कौशल्य सन्मानचिन्ह, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि सन्मान चिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रात नैपुण्य प्राप्त करणाऱ्यांचाही सत्कार करण्यात आला. त्यात राष्ट्रीय जलतरणपटू शिवराज मालवी, युवा सिने अभिनेता शक्तीवीर धिराल, पत्रकार मनीष रक्षमवार, राष्ट्रीय कबड्डी खेळाडू धीरज पाशी आणि राष्ट्रीय खो-खो खेळाडू हार्दिक निंबाळकर यांचा समावेश आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे उपाध्यक्ष प्रा.महेश पानसे, सुत्रसंचालन प्रशांत कऱ्हाडे, आभारप्रदर्शन जिल्हा संघटक रुपचंद धारणे यांनी मानले. कार्यक्रमाला पत्रकार आणि शहरातील नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जिल्हा संघटक रूपचंद धारणे यांच्या मार्गदर्शनात चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष शंकर बोरघरे यांच्या नियोजनात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ भद्रावतीचे कार्याध्यक्ष पवन शिवणकर, अध्यक्ष शाम चटपल्लीवार , सरचिटणीस सुनिल दैदावार, माजरी शाखा अध्यक्ष अनिल इंगोले, महेश निमसटकर, पुंडलिक येवले, विलास येरगुडे, निशांत देवगडे, दीपक आसुटकर, अतुल वनकर, जितेंद्र माहुरे, विनोद वांढरे, वैभव निंबाळकर, नासिर शेख यांनी विशेष परिश्रम घेतले.

# विवेकानंद महाविद्यालयात १२ वी च्या विद्यार्थ्यांना निरोप




**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट), वरोरा चे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान होते. प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव उमाटे होते. यावेळी प्रा. रामकृष्ण मालेकर, प्रा. खोजराज कापगते, प्रा.नरेंद्र लांबट, डॉ. सुधीर आस्टुनकर यांच्यासह इतर मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.नरेंद्र लांबट, संचालन सानिया रामटेके,आभार प्रदर्शन आनंदी पॉल यांनी केले .कार्यक्रमाला वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक ,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते . कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वर्ग ११ वी च्या विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# शांताबाई नखाते विद्यालय पाथरी येथे बक्षीस वितरण व निरोप समारंभ संपन्न

## यशस्वी होण्यासाठी दृढ निश्चयाची आवश्यकता-भावनाताई नखाते

**पाथरी । लक्ष्मण उजगरे**

विद्यार्थ्यांनी ज्ञान संपादनासोबतच आपले ध्येय व उद्दिष्ट निश्चित करणे गरजेचे आहे. चिकाटी आणि दृढ निश्चय हाच यशाचा खरा मार्ग आहे, असे प्रतिपादन वाल्मिकी शिक्षण प्रसारक मंडळाच्या सचिव भावनाताई अनिल राव नखाते यांनी केले. त्या शांताबाई नखाते माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पाथरी येथे ५ फेब्रुवारी २०२५ रोजी पारितोषिक वितरण व निरोप समारंभाच्या कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून बोलत होत्या.




या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून स्व. स.गो. नखाते माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य बि.आर. होगे, खान अब्दुल गफार खान उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य जी. जी. पितळे, महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डी. आर. चौरे, प्राचार्य के.एन. डहाळे, उपमुख्याध्यापक आर. जे. गुंडेकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सचिन चव्हाण यांनी केले. प्राचार्य बि.आर. होगे आणि डी. आर. चौरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कुमारी प्रतीक्षा मुंडे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि पारितोषिक वितरित करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मानसी घाटूळ आणि कु. गायत्री घाटूळ यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. राजकुमार कांबळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# महिला महाराष्ट्र केसरी किताबाची मानकरी ठरली भाग्यश्री फंड

## स्पर्धेत विविध वजन गटांतील विजेते

| | |
|---|---|
| ५० किलो: | नंदिनी साळोखे (प्रथम), रिया डेंगे (द्वितीय), अर्पिता गोळे व शिवानी कर्चे (तृतीय) |
| ५३ किलो: | स्वाती शिंदे (प्रथम), ज्ञानेश्वरी पायगुडे (द्वितीय), रूपाली शिंदे व अनुष्का हासपे (तृतीय) |
| ५५ किलो: | सिद्धी ढमढेरे (प्रथम), साक्षी चंदनशिवे (द्वितीय), नेहा चव्हाण व भूमी काळे (तृतीय) |
| ५७ किलो: | तनवी मगदूम (प्रथम), आश्लेषा बांगडी (द्वितीय), आर्या बाणेकर व स्मिता पाटील (तृतीय) |
| ५९ किलो: | धनश्री फंड (प्रथम), गौरी पाटील (द्वितीय), आकांक्षा नलावडे व स्नेहल पालवे (तृतीय) |

**देवळी । प्रतिनिधी**

महिला महाराष्ट्र केसरी किताब २०२४/२५ स्पर्धेत पुण्याच्या भाग्यश्री फंड हिने अंतिम सामन्यात कोल्हापूरच्या अमृता पुजारी हिचा पराभव करून विजेतेपद मिळवले. सार्वजनिक बजरंग व्यायाम शाळा, देवळीच्या वतीने आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने ही स्पर्धा विदर्भ केसरी खासदार रामदास तडस इनडोअर स्टेडियम येथे झाली.

भाग्यश्री फंड हिचा सन्मान महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री पंकज भोयर, राज्यसभा खासदार अनिल बोंडे, माजी खासदार रामदास तडस यांच्या हस्ते चांदीची गदा देऊन करण्यात आला. आमदार राजेश बकाणे, प्रताप अडसर, सुमित वानखेडे, यावलकर, क्रीडा भारतीचे




प्रसाद महानकर, राज्य कुस्तीगीर संघाचे सरचिटणीस हिंद केसरी पै. योगेश दोडके आदी उपस्थित होते. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. नरेंद्र मदनकर, नंदुभाऊ वैद्य, अंकित टेकाडे, सुनीता तडस, सरपंच सौरभ कडू, रविभाऊ करोटकर यांनी परिश्रम घेतले.

# चांदेकसारे घारी रस्त्याचे व पुलाचे दुर्दैव कधी संपणार? नागरिक संतप्त-आबासाहेब पवार

**कोपरगाव । प्रतिनिधी**

चांदेकसारे व कुंभारी या दोन गावाच्या दरम्यान पंतप्रधान ग्राम सडक योजनेअंतर्गत तयार झालेला रस्ता अनेक ठिकाणी खड्डे पडल्यामुळे तसेच अरुंद झाल्यामुळे त्याची मोठी दुरावस्था झाली आहे. या भागातील दळणवळणासाठी मोठी कसरत सुरू आहे. कोट्यवधीच्या वल्गना आणि फलकबाजी होऊन देखील काम अद्याप झाले नाही. नक्की निधी कुठे गेला ? काम का नाही झाले यावर कुणीही बोलण्यास तयार नाही त्यामुळे निधी हरवला आहे का अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे अशी अशी प्रतीक्रिया घारी येथील प्रगतशील शेतकरी आबासाहेब पवार यांनी दिली आहे.

दरम्यान ह्या रस्त्याची ठेकेदाराच्या अखत्यारीतील देखभाल दुरुस्ती काळातही या रस्त्याची कधी दुरुस्ती झाली नाही.अथवा देखरेख करणारी यंत्रणा देखील कधीही दिसली नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अनेक ठिकाणी रस्त्यावर वेड्या बाभळीची झाडे वाढलेली आहेत. दोन गावांच्या दरम्यान रस्त्यावर जे पूल बांधलेले आहेत त्यांचेही कठडे तुटलेले आहेत, पुलाची दुरावस्था झालेली आहेत त्यामुळे अपघात घडत आहेत. तसेच अनेक ठिकाणी रस्ता अनधिकृतरित्या खोदल्यामुळे खड्डे तयार झालेले आहेत या गोष्टी निदर्शनास आणून त्याकडेही संबंधित यंत्रणेचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे अशी चर्चा आहे.



घारी येथील नदीवरील असणारा पूल अनेकदा पुराच्या पाण्याखाली जाऊन कमकुवत झाला आहे.बाजूचे लोखंडी सुरक्षा कठडे तुटून पडलेले आहेत,त्यामुळे या पुलाची उंची वाढवून त्याची दुरुस्ती होण्याची मागणी अनेक दिवसांपासून होत होती. त्यावर निवडणुकीच्या आधी १ कोटी ८० लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याच्या फलकबाज्या झाल्या मात्र प्रत्यक्ष काम सुरू होईल हे दिवास्वप्नच ठरले आहे.आगामी पावसाळा काही महिन्यावर आहे त्यात रस्त्यांची कामे होणार नाही त्यामुळे आता येत्या तीन चार महिन्यात ही कामे झाली नाही तर जनतेला धोकादायक प्रवासच नशिबी असणार आहे का अशी भावना झाली आहे.रस्ते हे ग्रामीण विकासाच्या धमन्या आहेत. भारत देश कृषीप्रधान असल्याने देशातील बहुतांश जनता ही ग्रामीण भागात राहते. ग्रामीण भागातील लोकसंख्येचे प्रमाण शहरी भागांच्या तुलनेत अधिक आहे. शहरी भागात विविध उद्योग व्यवसायांची प्रगती होत असली तरी त्याचे द्योतक गावातच आहे. उद्योग, व्यवसाय वा व्यापार हा शहरी भागात सुरू असला तरी त्यासाठी आवश्यक असलेला कच्चा माल अर्थात शेतमालाची निर्मिती ग्रामीण भागातच होत असल्याने शहर ते ग्रामीण भागापर्यंत पोहोचण्यासाठी, शेतमालाची वाहतूक करण्यासाठी ग्रामीण भागातील रस्ते चांगले असणे आवश्यक आहे.असे असले तरी शासन कोट्यावधी रुपये खर्च करून रस्त्याची निर्मिती करत असताना त्याचा दर्जा सांभाळणं त्यानंतर त्याची देखभाल व दुरुस्ती हे खरंतर शासकीय यंत्रणेचे काम आहे. याविषयी मात्र खूपच उदासीनता दिसून येते आहे अशीच दुरावस्था या रस्त्याची झाली आहे. रस्ता खड्डेमय झाल्यामुळे त्याचा परिणाम शेतकरी, दुग्ध व्यावसायीक, नोकरदार वर्ग, शालेय विद्यार्थी, शेतकरी मजूर महिला, दुग्धव्यवसाय करणारे, आरोग्य सेवा यासह विविध वर्गातील लोकांना यांचा मोठा शारीरिक आर्थिक मनस्ताप सहन करावा लागतो आहे असेही शेवटी पवार म्हणाले आहेत.

# युसूफ शेख यांची महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या सोलापूर जिल्हा कार्याध्यक्षपदी निवड

**सोलापूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या सोलापूर जिल्हा कार्याध्यक्षपदी प्रा. युसूफ शेख यांची निवड करण्यात आली आहे.

या निवडीबद्दल माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी त्यांचा सत्कार करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी महात्मा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय करमाळा चे प्राचार्य बी. के. पाटील, प्रा. सदानंद तरकशे, रवींद्र उकिरडे, मुख्याध्यापक माने (नामदेवराव जगताप विद्यालय, जातेगाव), शहाजी शिंगटे (पाडळी), अमृतलाल कटारिया, योगेश गायकवाड, दिगंबर रासकर, परदेशी आदी मान्यवर उपस्थित होते.



# रावगाव येथील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयात रथसप्तमी निमित्त सूर्यनमस्कार दिन साजरा

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील रावगाव येथील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयात रथसप्तमीचे औचित्य साधून सूर्यनमस्कार दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

शाळेतील शिक्षक प्रताप बरडे आणि सुहास कानगुडे यांनी विद्यार्थ्यांना सूर्यनमस्कार करून दाखवत त्याचे महत्त्व स्पष्ट केले. इयत्ता ५ वी ते १० वीच्या सुमारे २०० विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सूर्यनमस्कार नियमित करण्याचे आवाहन करत, करो योग, रहो निरोग हा संदेश दिला.कार्यक्रमास ज्येष्ठ शिक्षक




भाऊसाहेब सरडे, किरण परदेशी, हनुमंत रासकर, अंजली लांडगे, पप्पू राठोड यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## तुमसर मध्ये ५ कोटींच्या फसवणुकीचा पर्दाफाश

# बँक मॅनेजरसह १० आरोपी अटकेत राजकमल प्रेस दुकानात रोख रक्कम जप्त

**भंडारा । प्रतिनिधी**

तुमसर - तुमसर मध्ये एक मोठा आर्थिक फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला आहे, ज्यात ५ कोटी रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या (डउइ) पोलिसांनी आणि अँटी-टेररिस्ट ब्रांचने संयुक्त कारवाई करत ही मोठी फसवणूक उघड केली. प्राथमिक तपासात समोर आले आहे की, दिल्ली, छत्तीसगड आणि गोंदिया येथील काही आरोपींनी एका खाजगी बँकेच्या मॅनेजरला ५ कोटी रुपये देण्याचे आमिष दाखवले होते आणि त्या बदल्यात ८ कोटी रुपये ठढञ्ड द्वारे परत करण्याचे आश्वासन दिले होते.या टोळीने मॅनेजरला लालच दाखवून त्याला ५ कोटी रुपयांची रक्कम बँकेच्या लॉकरमधून काढून 'राजकमल प्रेस' दुकानात आणायला प्रवृत्त केले. मॅनेजरने या सूचनेला मान देत ५ कोटी रुपयांची रक्कम एका बॅगेत भरली आणि दुकानात नेली. परंतु, या मोठ्या रकमेची देवाणघेवाण बँकिंग चॅनल्समधून न करता एका दुकानदाराच्या माध्यमातून केली जात



होती, ज्यामुळे संशय निर्माण झाला.

स्थानिक पोलिसांना गुप्त माहिती मिळताच, त्यांनी तात्काळ कारवाई केली आणि 'राजकमल प्रेस' दुकानावर छापा टाकला. या धडक कारवाईत ५ कोटी रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली. यावरून पोलिसांना हे स्पष्ट झाले की, आरोपींचे जाळे दिल्ली, छत्तीसगड आणि गोंदिया पर्यंत पसरले आहे.या प्रकरणात एकूण ११ जणांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आली आहे. त्यापैकी १० आरोपींना अटक करण्यात आली असून, काही आरोपी फरार झाले आहेत. पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

पोलीस अधीक्षक नूरूल हसन यांनी पत्रकार परिषदेत या कारवाईबद्दल माहिती दिली. त्यांनी सांगितले की, ही फसवणूक स्थानिक पातळीवर मर्यादित नाही. यामागे एक मोठे रॅकेट कार्यरत आहे, ज्यात दिल्ली, छत्तीसगड आणि गोंदिया यांचा समावेश आहे. फरार आरोपींचा लवकरच शोध लागेल आणि दोषींवर कठोर कारवाई केली जाईल.सध्या या प्रकरणाचा पुढील तपास तुमसर पोलीस करत असून, फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. पोलिसांनी कारवाईत दोन चारचाकी वाहने देखील जप्त केली आहेत.ही मोठी कारवाई पोलिस अधीक्षक नूरूल हसन यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत कुलकर्णी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन चिंचोळकर , पोलीस निरीक्षक मिलिंद तायडे, पोलीस निरीक्षक नागलोत, पोलीस उपनिरीक्षक प्रवीण सैयाम आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केली. स्थानिक पोलिस अधिकारी आणि तपास पथकाच्या मेहनतीमुळे ही मोठी कारवाई यशस्वी झाली असून, लवकरच या प्रकरणाचा समग्र खुलासा होईल, असे पोलीस सूत्रांनी सांगितले.

# समृध्दी महामार्गावर सेलडोह शिवारात डिझेलच्या काळाबाजारावर कारवाई

## वाहनासह ८.६६ लाखांचा माल जप्त

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

समृध्दी महामार्गावर डिझेलच्या काळाबाजाराची गुप्त माहिती मिळाल्यानंतर सिंदी रेल्वे पोलीस व महामार्ग पोलीसांनी संयुक्त कारवाई करत सेलडोह शिवारातील किलोमीटर २८/५०० येथे आयशर ट्रक (क्र. चझ ०९ गग ३२७६) ताब्यात घेतला. तपासणीदरम्यान ट्रकमध्ये २४ प्लास्टिक कॅन आढळले, त्यापैकी १६ कॅनमध्ये एकूण ६३० लिटर डिझेल आढळून आले. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करून एकूण ८,६६,९२० रुपये किमतीचा माल जप्त करण्यात आला.



ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन, अपर पोलीस अधीक्षक डॉ. सागरकुमार कवडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार संतोष दरेकर, पो.उप.निरीक्षक श्यामसुंदर सूर्यवंशी, तसेच महामार्ग पोलीस वर्धा यांच्यासह संजय भगत, प्रफुल डफ, उमेश खामनकर, सचिन उईके, सुधीर बावणे, वैध व कोवरते यांनी केली.

# पोलीस मित्र संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी गोपाळ मंत्री आणि ममता पैठणकर

**गंगाखेड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पोलीस मित्र संघटनेच्या परभणी जिल्हाध्यक्षपदी (ग्रामीण) गोपाळ मंत्री, तर महिला जिल्हाध्यक्षपदी ममता पैठणकर यांची निवड करण्यात आली. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दिनेश कुलकर्णी यांनी त्यांना नियुक्ती पत्र प्रदान केले.

शासकीय विश्रामगृहात झालेल्या नियोजन व आढावा बैठकीत ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. यावेळी संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष लक्ष्मण पवार, रमेश जोगदंड यांची उपस्थिती होती. संघटनेच्या उद्देशांमध्ये पोलीस आणि नागरिकांमध्ये सहकार्याचे संबंध निर्माण करणे, गुन्हेगारी प्रवृत्ती रोखण्यासाठी प्रयत्न करणे आणि पोलीस बांधवांच्या न्याय हक्कांसाठी सामाजिक



उपक्रम राबवणे यावर भर देण्यात आला.कार्यक्रमाला बजरंग दलाचे अध्यक्ष संजय लाला आनावडे, तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष अनवर लिंबेकर, ग्राहक पंचायतचे जिल्हा उपाध्यक्ष सोपान टोले, सय्यद ताजुद्दीन, अथर्व रोडे, प्रा. अभिलाषा मंत्री, प्रतिमा वाघमारे, अर्चना जोशी, प्रा. सुरेखा शेंदकर, आशा रेघाटे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गोपाळ मंत्री यांनी केले, तर सूत्रसंचालन अभिलाषा मंत्री यांनी केले.

# परभणीत जनविरोधी अर्थ संकल्पाची होळी करून निषेध



**परभणी । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या २०२५ च्या अर्थसंकल्पातील शेतकरी व सामान्य नागरिक विरोधी धोरणांच्या निषेधार्थ किसान सभा व आयटकच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अर्थसंकल्पाची होळी करण्यात आली.

या अर्थसंकल्पात कॉर्पोरेट क्षेत्रासाठी २४.०३ लाख कोटींची कर्जमाफी, तर शेतकरी कर्जमाफीबाबत कुठलीही घोषणा नाही. तसेच कृषी क्षेत्रासाठीची तरतूद ५,००० कोटींनी घटवण्यात आली असून, प्रधानमंत्री पिक विमा योजनेसाठीही ३,६२२ कोटींची कपात करण्यात आली आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेसाठी अपेक्षित १०,००० रुपये अनुदान देण्याऐवजी केवळ ६,००० रुपयेच मंजूर करण्यात आले आहेत.या वेळी भाकप जिल्हा सचिव माधुरीताई क्षीरसागर, शेख आब्दुल भाई, ओंकार पवार, शिवाजी कदम, सय्यद अजहर, सुरेश इखे, प्रसाद गोरे, लिंबाजी कचरे, गजेंद्र शेरे, बाबुभाई, बालासाहेब आळणे यांच्यासह किसान सभा, आयटक, मराठवाडा हमाल माथाडी मजदूर युनियन, युथ फेडरेशन, aISF या संघटनांचे कार्यकर्ते व प्रतिनिधी उपस्थित होते.

# जनार्दन राऊत यांना राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार

**गंगापूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील खडक येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक जनार्दन राऊत यांना राज्यस्तरीय



जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. दैनिक सह्याद्रीचा राखणदार आयोजित पत्रकार सेवा संघ, महाराष्ट्र राज्य, लासूर यांच्या वतीने हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

राऊत हे अभ्यासू, शांत, संयमी, कवी, नाटककार तसेच जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेचे गंगापूर तालुकाध्यक्ष म्हणून ओळखले जातात. विद्यार्थ्यांच्या घडवणीत त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी स्वतःच्या पायावर उभे राहिले आहेत. शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात येत आहे.

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात किरण दुरगुडे यांचा सत्कार



**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा शहरातील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या वतीने नगरपरिषद बागमाळी किरण दुरगुडे यांचा सत्कार करण्यात आला. वृक्ष लागवडीतील योगदान लक्षात घेऊन महाविद्यालयाच्या समोरील प्रांगणात त्यांनी केलेल्या हरित उपक्रमाची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

डॉ. रुपालीताई विक्रांत घुमरे, उपप्राचार्य डॉ. अनिल साळुंखे (जिल्हा समन्वयक, एनएसएस) आणि प्रा. लक्ष्मण राख यांच्या हस्ते दुरगुडे यांना सन्मानपत्र, हार व नारळ देऊन गौरविण्यात आले. संस्थेचे सचिव विलासराव घुमरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा सत्कार करण्यात आला.दुरगुडे यांनी महाविद्यालयाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड व देखभाल करून परिसराला आनंददायी रूप दिले आहे. त्यांच्या कार्याचे करमाळा तालुक्यातील नागरिकांकडूनही कौतुक होत आहे.

# माळशिरस तालुक्यात बिबट्याची दहशत कायम



**सोलापूर । प्रतिनिधी**

दसुर, ता. माळशिरस येथील शेतकरी चंद्रकांत रामचंद्र रणवरे यांच्यावर बिबट्याने हल्ला केला असून त्यात ते जखमी झाले आहेत. हल्ल्यानंतर बिबट्या पळत असताना पंढरपूर-माळशिरस रस्त्यावर दसुरपाटी जवळ अज्ञात वाहनाने धडक दिल्याने बिबट्या गतप्राण झाला.

दुसऱ्या बिबट्याने दसुर पाटी, केसकरवाडी, मुजावर फाटा या परिसरात वावरणे सुरू ठेवले आहे, ज्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वनविभागाने तातडीने या प्रकरणाची दखल घेऊन बंदोबस्त करण्याची आवश्यकता आहे, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

मागील महिन्यात धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यात वाघ आणि बिबट्यांचा वावर दिसून आलेला आहे, ज्यामुळे तेथील नागरिक भयभीत झाले होते. आता सोलापूर जिल्ह्यात बिबट्याचा वावर दिसून आल्याने नागरिकांची चिंता वाढली आहे. वन विभाग त्यावर कोणती कारवाई करणार, हे पाहावे लागेल.

# मनेगाव सरपंच रमेश साळुंके यांना महाराष्ट्र जीवन गौरव पुरस्कार

**वैजापूर । प्रतिनिधी**

मनेगावचे सरपंच रमेश रावसाहेब साळुंके यांना त्यांच्या गावातील उल्लेखनीय कार्यासाठी महाराष्ट्र राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे. हा पुरस्कार लासुर स्टेशन येथील स्वराज मंगल कार्यालयात वितरण करण्यात येईल.



साळुंके यांनी आपल्या कार्यकाळात मनेगाव गावात अनेक विकास कार्ये राबविली आहेत. त्यांनी प्रत्येक घरापर्यंत पिण्याच्या पाणी पाईपलाईनची व्यवस्था, संपूर्ण गाव गड्डे मुक्त केले, तसेच फेवरबैंक बसविण्याचा उपक्रम राबविला. जल जीवन मिशनअंतर्गत रान मळ्यांपर्यंत पाणी पोहोचविणे आणि गावात झाडांची लागवड करणे यासारखे कार्य त्यांनी यशस्वीपणे केले.त्यांच्या कार्याची दखल घेऊन राज्य पत्रकार संघाने त्यांना हा पुरस्कार दिला आहे. सरपंच रमेश साळुंके यांच्या कार्यामुळे मनेगावचा विकास झाला असून, त्यांचे कार्य संपूर्ण गावातील नागरिकांनी कौतुक केले आहे.

# अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या योजनेसाठी २० फेब्रुवारी पर्यंत अर्ज करा

**चंद्रपूर**–साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित जिल्हा कार्यालय चंद्रपूर मार्फत थेट कर्ज योजनेअंतर्गत अनुसूचित जातीतील मांग/ मातंग व या समाजातील बारा पोट जातीतील लाभार्थ्यांकरीता ३० चे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. इच्छुक लाभार्थ्यांनी २० फेब्रुवारी २०२५ पर्यंत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हा कार्यालय चंद्रपूर येथे प्रत्यक्ष येऊन अर्ज सादर करावे.

लाभार्थ्याशिवाय इतर व्यक्तीकडून अर्ज स्विकारण्यात येणार नाही. लाभार्थीचे निवड चिट्टी काढून लॉटरी पध्दतीने करण्यात येईल, याची लाभार्थींनी नोंद घ्यावी. कर्ज प्रकरण १ लक्ष च्या मर्यादित मंजूर करण्यात येईल.

# माजी आमदार प्राजक्त तनपुरे पुन्हा ॲक्टिव्ह; मुख्यमंत्री महोदयांना गंभीर प्रश्नाकडे लक्ष देण्याचे आवाहन

**राहुरी । शहाजी दिघे**

विधानसभेतील पराभवानंतर माजी मंत्री प्राजक्त तनपुरे पुन्हा एकदा ॲक्टिव्ह झाल्याचे दिसत असून, विविध कार्यक्रमांना त्यांनी उपस्थिती लावली आहे. राज्यातील बांधकाम ठेकेदारांच्या थकीत बिलांबाबत मुख्यमंत्र्यांना लक्ष वेधण्याचे आवाहन सोशल मीडियावर त्यांनी केले आहे.



विधानसभा निवडणुकीत युती सरकारचे कल दिसत असतानाही, राहुरी विधानसभा मतदारसंघात विक्रमी कामे करूनही आणि लोकप्रियतेसह माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांना पराभवाला सामोरे जावे लागले. मात्र त्यानंतरही तनपुरे न खचता राहुरी, नगर आणि पाथर्डी मतदारसंघातील त्यांच्या समर्थकांसाठी पुन्हा एकदा ॲक्टिव्ह झाल्याचे दिसत आहे.

राहुरी तालुक्यासह विविध ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रम आणि लग्न समारंभांना उपस्थिती देऊन, तनपुरे यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रातील आपले स्थान मजबुत केले आहे. तसेच, गेल्या काही दिवसांपासून राज्यातील बांधकामांच्या थकित देण्यावर त्यांनी सोशल मीडियावर मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले आहे.ते म्हणाले, सरकारच्या विविध विभागांद्वारे सुरू असलेल्या बांधकाम कार्यांचे सुमारे ८९ हजार कोटी रुपये शासनाने जुलै २०२४ पासून थकवले आहेत. महाराष्ट्र स्टेट कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनने सुरू असलेली कामे थांबवण्याचा इशारा दिला आहे. ५ फेब्रुवारीपासून विकास कामांना थांबा लागण्याचा प्रश्न आता उपस्थित होतोय.ते पुढे म्हणाले, खिशात दिडकी नसताना गतिमान महाराष्ट्राच्या गप्पा मारायच्या आणि अनेक मोठे प्रकल्प जाहीर करायचे मात्र त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी पैसे नाहीत. त्यात सुकाळ योजनांचा बोजा स्वार्थासाठी शासनाच्या तिजोरीवर ओढवून घेतला. आता विकास कामे बंद होण्याची नामुष्की सरकारवर येतेय.तनपुरे यांनी मुख्यमंत्री महोदयांना आपली वचनांची परिपूर्णता दाखवण्याचा इशारा दिला, दावोस वारीचे गोडवे गाणे संपले असेल तर मुख्यमंत्री महोदयांनी आता या गंभीर प्रश्नाकडे विशेष लक्ष द्यावे.सध्या तनपुरे यांनी केलेल्या टिकेबाबत सर्वत्र जोरदार चर्चा सुरू झाली आहे, आणि सरकारच्या बांधकाम धोरणावर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

# ठाणे उप-जिल्हाधिकारी यांचा शेतकऱ्याच्या बांधावर ॲग्री स्टॅग दौरा

## शहापूर तहसील,मंडळ कार्यालय,तलाठी सजा केली दफ्तर तपासणी

**शहापूर । रविंद्र धारवणे**

तालुक्यातील उत्कृष्ट शेती आणि शेतकरी असे समीकरण ओळखले जाणारे गाव म्हणजे वासिंद जवळील दहागाव! आज या शेती प्रदान गावात ॲग्री स्टॅग योजने अंतर्गत शेतकऱ्यांच्या सातबारा आधार लिंक जोडणी संदर्भात उपजिल्हाधिकारी मंजुषा जायेभाये यांचा शेतकऱ्यांच्या शेत-बांधावर एग्री स्टॅग मार्गदर्शन दौरा आयोजित करण्यात आला.या दौऱ्यात दहागाव येथील शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नांना मार्गी लावण्याचा प्रयत्न प्रमुख अतिथींनी केला. शेतकऱ्यांना ॲग्री स्टॅग विषयी माहिती देत, भविष्यात येणाऱ्या शेतकी योजनांचा लाभ सातबारा आधार लिंकच्या माध्यमातून सोप्या पद्धतीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवला जाईल, असे उपजिल्हाधिकारी मंजुषा जायेभाये यांनी सांगितले.

त्यांनी शेतकऱ्यांना संबोधित करत सांगितले की, ॲग्री स्टॅगच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ओळख प्रमाणपत्र मिळणार असून, यामुळे अनेक नवनवीन योजनांचा लाभ मिळवता येईल. शेतकऱ्यांना कोणत्याही शेती संबंधित अडचणींवर ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहनही त्यांनी केले.आदिवासी वनपट्टे धारकही या योजने अंतर्गत आपले शेतकरी ओळख प्रमाणपत्र तयार करून योजनांचा लाभ घेऊ शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले. शहापूर तहसील कार्यालय, मंडळ अधिकारी कार्यालय, तलाठी कार्यालय यांची दफ्तर तपासणी देखील उपजिल्हाधिकारी यांनी केली आणि अधिकारी व कर्मचार्यांना शेतकऱ्यांची कामे वेळेत पूर्ण करण्याचे आदेश दिले.कार्यक्रमाच्या वेळी शहापूर तहसीलदार परमेश्वर कासुले यांनी शेतकऱ्यांना शेती आणि महसूल विषयक मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांच्या स्वागतासाठी, त्यांनी शेतातील ताज्या भाज्यांनी बांबूच्या टोपलीत सजावट करून एक आगळीवेगळी भेट दिली. या कार्यक्रमात शहापूर मंडळ अधिकारी शशिकांत बनकर, तलाठी सजा दहागाव-सारमाल तलाठी राधा खुळे, कृषी विभागाचे हेमंत पारधी, शेतकरी संघटना तालुका अध्यक्ष आणि पत्रकार रविंद्र गोतरणे, जेष्ठ शेतकरी गुरुनाथ देसले, आगरी सेनेचे कृष्णा परटोळे, कृषी पुरस्कृत शेतकरी संजय पाटील, ग्रामपंचायत ऑपरेटर संजीवनी वेखंडे यांच्यासह अनेक स्थानिक शेतकरी, महिला शेतकरी उपस्थित होते.



# खोकरला पतंजली योग समिति तर्फे डॉ.रमेश खोब्रागडे यांचा सत्कार

**भंडारा । प्रतिनिधी**

भंडारा येथील भारत स्वाभिमान न्यासचे जिल्हा प्रभारी डॉ. रमेश खोब्रागडे यांना हरिद्वार येथे योगरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. म्हणून खोकरला पतंजली योग समिति तर्फे डॉ. रमेश खोब्रागडे यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पतंजली योग परिवारचे जिल्हा प्रभारी रत्नाकर तिडके, जिल्हा सहप्रभारी भोजराम झंझाड, पतंजलि योग समिति खोकरला चे अध्यक्ष यशवंत बिरे, सामाजिक कार्यकर्ते विलास केजरकर, किसान सेवा समिति जिल्हा प्रभारी सुरेंद्र पांडे, राहुल मेश्राम, योग शिक्षक दिलीप वालदे, अंजली बोरकर, छाया मेश्राम व सत्कारमूर्ती भारत स्वाभिमान न्यास भंडारा जिल्हा चे जिल्हा प्रभारी डॉ. रमेश खोब्रागडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.डॉ. खोब्रागडे यांना योगरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल खोकरला पतंजली योग परिवारातील सर्व पदाधिकारी, योग शिक्षक, योग साधक, आणि कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले.




कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी डॉ. रमेश खोब्रागडे यांच्या कार्याचा गौरव केला आणि पतंजली योग परिवाराने केलेल्या कार्याची पावती म्हणून हा पुरस्कार दिला असल्याचे सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पतंजलि योग समिति खोकरला चे सुरेश घोडे यांनी तर प्रास्ताविक यशवंत बिरे यांनी केले. आभार योग शिक्षक रमेश बुरबादे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्याधर बेहरे, प्यारेलाल शहारे, नितिन कडव, महादेव वंजारी, रामलाल शेंडे, बाबुलाल दमाहे, महादेव चांदेकर, दामोधर बोदेले, श्रीकृष्ण जिभकाटे, राजकुमार वाहणे, वंदना धांडे, गीता आगाशे, पल्लवी निकुरे, मिना रोकडे, मंदा चावरे, ओमकांता भोंडे, मिना चावरे, दुधकवार, राऊत व खोकरला पतंजली योग परिवारातील सर्व पदाधिकारी, योग शिक्षक, योग साधक व कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

# आदर्श विद्यालय पळसपूरच्या दहावी बॅचचा २४ वर्षांनंतर गेट टुगेदर उत्साहात साजरा

**पारनेर । प्रतिनिधी**

पारनेर तालुक्यातील पळसपूर येथील आदर्श विद्यालयाच्या दहावी वर्गाच्या २०००-२००१ बॅचचे माजी विद्यार्थी २४ वर्षांनंतर एकत्र आले आणि यशोधन ग्रो टुरिझम, नारायणगाव येथे आयोजित केलेल्या गेट टुगेदर कार्यक्रमात उत्साहाने सहभागी झाले. वय, पद, प्रतिष्ठा आणि कामाच्या व्यापाची पर्वाह न करता सर्व सहभागी माजी विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा आनंद घेतला.कार्यक्रमाचे आयोजन कानिफनाथ आहेर आणि राजेंद्र आहेर यांनी केले होते. ज्योतीताई झावरे (जाधव मॅडम) यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना सादर केली, तर संभाजी भाईक आणि संदीप पुरी यांनी संपूर्ण गेट-टुगेदरचे प्रभावी निवेदन केले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली.रेश्माराणी पठारे (आवळे मॅडम)



यांनी देवा श्री गणेशा या गीतावर सुंदर नृत्य सादर करून वातावरण भारावून टाकले. माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत मनोगत व्यक्त केले. यशोधन ग्रो टुरिझमच्या निसर्गरम्य वातावरण, उत्तम भोजन व्यवस्था आणि सुशोभित गार्डनमुळे कार्यक्रम आणखी संस्मरणीय ठरला.दत्तात्रय हरीभाऊ भाईक यांनी या दिवसाची भावना व्यक्त करताना सांगितले की, जुन्या मित्रमैत्रिणींच्या भेटीगाठी, हसण्याखेळण्यात हरवलेले क्षण आणि आठवणींनी भरलेला हा दिवस सर्वांच्या मनात सदैव जिवंत राहील.

# शबरी आदिवासी वित्त व विकास महा मंडळाद्वारा कर्ज योजनेसाठी अर्ज आमंत्रित

## जिल्हयातील इच्छुकांनी ०१ ते २० फेब्रुवारीपर्यंत ऑनलाइन फॉर्म भरावा

**भंडारा । प्रतिनिधी**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. शाखा कार्यालय देवरी अंतर्गत सन २०२४-२०२५ साठी आदिवासी बांधवांसाठी एन.एस.टी.एफ.डी.सी. नवी दिल्ली पुरस्कृत स्वयंरोजगार कर्ज योजना राबविण्यात येत आहे. गोंदिया व भंडारा जिल्ह्यांसाठी या योजनेसाठी लक्षांक प्राप्त झाला आहे.या योजनेत महामंडळाचा ९५% सहभाग असून, लाभार्थ्याचा ५% सहभाग राहील. इच्छुक लाभार्थ्यांनी ०१ ते २० फेब्रुवारी २०२५ दरम्यान शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या संकेतस्थळावर (https://www.mahashabari.in) ऑनलाइन अर्ज भरावेत.कर्ज योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे म्हणजे जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रेशन कार्ड, बँक पासबुक, ड्रायव्हिंग लाइसन्स (वाहनासाठी) इत्यादी. या कागदपत्रांशिवाय अर्ज स्वीकारला जाणार नाही, असे शाखा व्यवस्थापक प्रफुल वि. पाटील यांनी स्पष्ट केले आहे. अर्जदारांना योजनेसाठी पात्रता, अटी व कागदपत्रांची माहिती कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर उपलब्ध आहे.

**या कर्ज योजनेसाठी खालील व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध आहे:**

**१) महिला सशक्तीकरण योजना (रु. २ लक्ष)**
**२) स्वयंसहायता बचत गट योजना (रु. ५ लक्ष)**
**३) कृषी आणि संलग्न व्यवसाय (रु. २ लक्ष)**
**४) हॉटेल ढाबा व्यवसाय (रु. ५ लक्ष)**
**५) ऑटो वर्कशॉप स्पेअर पार्ट/गॅरेज (रु. ५ लक्ष)**
**६) लहान उद्योगधंदे (रु. २ लक्ष)**
**७) वाहन व्यवसाय (रु. १० लक्ष)**
**८) ऑटो रिक्षा / मालवाहू रिक्षा (रु. ३ लक्ष)**
**९) लघु उद्योग व्यवसाय (रु. ३ लक्ष)**

# मुलगा होत नसल्याने विवाहितेचा छळ सासरच्या ५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

## भरोसा सेलमध्ये समझोता न झाल्याने दैठणा पोलिसांची कारवाई

**परभणी । लक्ष्मण उजगरे**

मुलगा न होण्याच्या कारणावरून विवाहितेचा शारिरिक आणि मानसिक छळ केल्याचा प्रकार समोर आला आहे. सासरच्या पाच जणांविरुद्ध दैठणा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी सासरच्या मंडळींनी दोन वेळा विवाहितेला घराबाहेर हाकलले होते. सोनाली कच्छवे हिचा विवाह २० एप्रिल २०१७ रोजी जांब येथील धनंजय श्रीहरी बडगुजर याच्यासोबत झाला होता. पहिली मुलगी झाल्यानंतर सासरच्या मंडळींना त्यात समाधान न आल्याने सोनालीला मानसिक त्रास दिला. दुसरी मुलगी झाल्यानंतर सासरच्या मंडळींनी तिला उपाशी ठेवून सातत्याने छळ केला.

मार्च २०२० मध्ये सोनालीला घरातून हाकलून देण्यात आले होते. ती माहेरी दैठणा येथे आली होती, मात्र तिला समजावून सांगून पुन्हा सासरी निघायला भाग पाडले. त्यानंतर मुलगा न होण्याच्या कारणावरून तिच्यावर शारिरिक आणि मानसिक छळ सुरू ठेवण्यात आला. २२ मे २०२२ रोजी तीला जिवे मारण्याची धमकी देऊन पुन्हा घराबाहेर हाकलले गेले.सोनालीने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या भरोसा सेलमध्ये अर्ज दाखल केला होता. त्यानंतर सासरच्या मंडळींनी समझोता न केल्यामुळे सोनालीने पती, सासू, दीर आणि जाऊ यांच्यासह पाच जणांविरुद्ध दैठणा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## उच्च न्यायालयाचा मोठा धक्का

# दादा पाटील फराटे आणि सुधीर फराटे यांना ५ वर्षांसाठी सहकार निवडणूक लढवण्यास बंदी

**शिरूर । रमेश बनसोडे**

शिरूर तालुक्यातील दादा पाटील फराटे आणि सुधीर फराटे यांना उच्च न्यायालयाने मोठा धक्का दिला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार, त्यांना पुढील ५ वर्ष सहकार क्षेत्रातील कोणतीही निवडणूक लढवता येणार नाही. याशिवाय, त्यांना कोणत्याही संस्थेवर स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्त होण्यास देखील बंदी घालण्यात आली आहे. या निर्णयामुळे शिरूर तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे.दोन प्रमुख नेत्यांच्या या निर्णयामुळे सहकार क्षेत्रातील त्यांचे अस्तित्व धोक्यात येण्याची शक्यता आहे. शरद बँकेच्या थकबाकीमुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. मांडवगण फराटा येथील विविध कार्यकारी सोसायटीचे दादा पाटील आणि सुधीर फराटे हे २०१८ मध्ये संचालक होते. त्यावेळी दादा पाटील यांच्यावर शरद बँक आणि मांडवगण फराटा सोसायटीला १८ लाख ७३ हजार १६३ रुपये, तर सुधीर फराटे यांच्यावर १४ लाख ७ हजार ७४८ रुपयांची थकबाकी होती. त्यामुळे त्यांच्या संचालकपद रद्द करण्यासाठी सोसायटीचे अध्यक्ष महादेव किसनराव फराटे



आणि उपाध्यक्ष राजाराम विश्वनाथ शितोळे यांनी शिरूर सहायक निबंधकाकडे तक्रार केली होती.

या प्रकरणी सुरूवातीला दादा पाटील आणि सुधीर फराटे यांच्या बाजूने निकाल लागला होता. मात्र, महादेव फराटे आणि राजाराम शितोळे यांनी याविरुद्ध पुणे विभागीय सहनिबंधकांकडे अपील केले. ४ मार्च २०२१ रोजी विभागीय सहनिबंधकांनी दादा पाटील आणि सुधीर फराटे यांना ५ वर्षासाठी सहकार क्षेत्रातील निवडणुका लढविण्यावर बंदी घालण्याचा आदेश दिला.नंतर, या निर्णयाच्या विरोधात दादा पाटील आणि सुधीर फराटे यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाद मागितली होती. आता उच्च न्यायालयाने विभागीय सहनिबंधकाच्या निर्णयास मान्यता देत, त्यांना सहकार निवडणूक लढविण्यास ५ वर्षांसाठी अपात्र ठरवले आहे.या निर्णयामुळे शिरूर तालुक्यातील अजितदादा गटाला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे. आता याबाबत अजून काय घडामोडी घडतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# रेती चोरट्यांवर नायब तहसीलदार ठाकरे यांची धडक कारवाई

## ३ लाख १५ हजार ५०० रुपयांचा ठोठावला दंड

**धडक कारवाईमुळे रेती माफियांचे धाबे दणाणले;कारवाईचे सर्वस्तरावरून कौतुक**

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

नजीकच्या वणा नदीपात्रातून उंबरा घाटातून चोरट्या मार्गाने अवैधरीत्या वाळूचे उत्खनन करून दिग्रज-सिंदी सीमेवर टिप्परच्या साह्याने वाळूची वाहतूक करत असलेल्या रेती माफियावर कर्तव्यदक्ष नायब तहसीलदार मधुकर ठाकरे यांनी धडक कारवाई केली. अमोल भिसे (३५), उंबरा तालुका समुद्रपूर, जिल्हा वर्धा हा रेती चोरटा पकडला गेला. या कारवाईमध्ये नायब तहसीलदार यांनी ३ लाख १५ हजार ५०० रुपयांचा दंड ठोठावला, ज्यामुळे रेती माफियांचे धाबे दणाणले असून या धडक कारवाईचे सर्वस्तरावरून कौतुक होत आहे.

मागील तीन महिन्यांपासून उंबरा घाटावरून अवैधरीत्या वाळूची तस्करी सुरू होती. ५ फेब्रुवारीच्या पहाटे ४ वाजता नायब तहसीलदार ठाकरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी गस्त घेत असताना चक-३२ट-५५७४




क्रमांकाचा टिप्पर वाळूने भरून वाहतूक करत असताना आढळला. नायब तहसीलदार ठाकरे यांनी वाहन चालकास परवान्याबाबत विचारले असता, तो कोणत्याही प्रकारचा परवाना सादर करू शकला नाही. वाहन चालकाने सांगितले की, टिप्पर अमोल भिसे यांच्या मालकीचे आहे. तपासाअंती टिप्परमध्ये पाच ब्रास वाळू सापडली, ज्यावर वाहन जप्तीची कारवाई करण्यात आली आणि संबंधित वाहन पोलिस स्टेशन सिंदी (रेल्वे) येथे जप्त करण्यात आले. नायब तहसीलदार मधुकर ठाकरे यांनी ३ लाख १५ हजार ५०० रुपयांचा दंड ठोठावला असून ही कारवाई सर्वस्तरावरून प्रशंसा मिळवत आहे. या धडक कारवाईमुळे अवैध रेती वाहतूक करणाऱ्या माफियांच्या उरात धडकी भरली आहे. ही कारवाई तहसीलदार सेलू रेवैया डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली सिंदीचे नायब तहसीलदार मधुकर ठाकरे, ग्राम महसूल अधिकारी सिंदी (रेल्वे) तिलक चंदनखेडे आणि ग्राम महसूल अधिकारी जुनोना यांनी केली. नायब तहसीलदार ठाकरे यांनी इशारा दिला की, पुढे अवैध रेती वाहतूक करतांना दिसून आले तरी त्यावर कडक कारवाई करण्यात येईल.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# माघ वारीनिमित्त औसा संस्थानचा पायी दिंडी सोहळा;१६० वर्षांपासूनची दिंडीची परंपरा कायम

## डिकसळ येथे पार पडला आश्वाचा गोल रिंगण सोहळा;१७ ते १८ हजार भाविकांची उपस्थिती

**मोहोळ । प्रतिनिधी**

गंभीर भक्तिमय वातावरणात माघ वारीनिमित्त औसा संस्थानचा पायी दिंडी सोहळा पार पडला. सुमारे १६० वर्षांपूर्वी सुरू झालेली ही परंपरा आजही तितकीच अभिमानाने आणि श्रद्धेने जोपासली जात आहे. औसा येथील वीरनाथ मल्लनाथ महाराज संस्थानाच्या पायी दिंडी सोहळ्यात मराठवाडा, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणा येथून आलेले सुमारे १७ ते १८ हजार भाविक सहभागी झाले. पायी दिंडी सोहळ्याचे पारंपरिक स्वागत नरखेड, डिकसळ, मसले चौधरी या गावांमध्ये भक्तिमय वातावरणात करण्यात आले. डिकसळ येथील भोगावती नदीपात्राच्या शेजारी शेतात खेळ मांडण्यात आले होते, तसेच माऊलीच्या गोल रिंगण सोहळ्याचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. रिंगण सोहळ्यात झेंडेकरी, तुळशीमाळ, विनेकरी, टाळकरी, हांडेवाले यांचा सहभाग होता.





सायंकाळी पाच वाजता डिकसळ येथील शेतात रिंगण सोहळा पार पडला. यावेळी श्रीरंग महाराज यांचे चिरंजीव गीतेश्वर महाराज, गुरुबाबा ज्ञानराज महाराज, श्रीरंग महाराज, वीरनाथ महाराज निटूरकर आणि विनेकरी हरिभाऊ वाडकर यांच्या उपस्थितीत सोहळा पार पडला. नरखेड येथे टाळ मृदंगाच्या व फटाक्यांच्या आतिषबाजीत स्वागत करण्यात आले. श्री सिद्धेश्वर मंदिरात पिठाधीपती गुरुबाबा महाराज औसेकर, दास महाराज औसेकर आणि श्रीरंग महाराज औसेकर यांच्या हस्ते आरती व महापूजा करण्यात आली. भाविकांना अन्नदान व औषधे वाटप करण्यात आले. डॉ. राज वसंतराव लवंगे यांनी पायी चालत येणाऱ्या भाविकांची मोफत तपासणी केली. या सोहळ्यात शिवसेनेचे माजी खासदार प्रा. रविंद्र गायकवाड यांनीही सहभाग घेतला, ज्यामुळे सोहळ्याचा आनंद आणखी द्विगुणित झाला.औसा येथील वीरनाथ मल्लनाथ महाराज संस्थानाच्या २६० वर्षांच्या वारकरी सांप्रदायिक गुरूपरंपरेत कार्यरत श्रीरंग महाराज यांचे चिरंजीव गीतेश्वर महाराज यांनी डिकसळ येथील रिंगण सोहळ्यात टाळ-मृदंगाच्या तालावर भक्तांचे लक्ष वेधून घेतले.

# रथसप्तमी निमित्त राहुरी योगा समुहा कडून २२१ सूर्यनमस्कारांची सलामी



**राहुरी । शहाजी दिघे**

राहुरी महाविद्यालय येथे गेल्या चार ते पाच वर्षांपासून नियमितपणे सकाळी ६ ते ७ वाजेच्या दरम्यान योगा साधक १०८ सूर्यनमस्कार घालतात. या दरम्यान योग साधकांनी आपसातील चर्चेत ठरवले की, रथसप्तमीच्या निमित्ताने आजपर्यंत घातलेल्या सूर्यनमस्कारांच्या संख्येइतके जास्त सूर्यनमस्कार घालून इतरांना शारीरिक व मानसिक स्वास्थ्याच्या महत्त्वाची प्रेरणा द्यायची.

याप्रसंगी श्री. विवेकानंद नर्सिंग होम ट्रस्टच्या आयुर्वेद महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. कड व प्रीतम बोरा यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच राहुरी नगरपरिषदेचे माजी नगरसेवक श्री. ज्ञानेश्वर (माऊली) पोपळघट यांच्या प्रेरणेतून रथसप्तमीला २२१ सूर्यनमस्कारांची सलामी देण्यात आली. या योजनेसाठी जाधव सर, रवि दरक, गिरीशशेठ सुराणा, अनिल निकम आणि सागर साळवे यांचा सहभाग होता.साधकांनी एकत्र येऊन हे उद्दिष्ट साधले, ज्यामुळे शारीरिक आरोग्य व मानसिक समृद्धतेसाठी योगासनाचे महत्त्व लक्षात आणले आणि इतरांना देखील त्यात सहभागी होण्याची प्रेरणा दिली.

# वाहतूक नियंत्रक विजय भांडे सेवानिवृत्त

**पुलगाव । प्रतिनिधी**

एसटी आगारातील वाहतूक नियंत्रक विजय भांडे ३१ जानेवारी २०२६ रोजी आपल्या २८ वर्षांच्या राज्य परिवहन सेवेतून सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्ताने आगारातील प्रशासन आणि कर्मचारी यांच्या वतीने त्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. विजय भांडे हे अखेरच्या क्षणी कार्यरत असताना अभाविपचे पूर्व कार्यकर्ते, भारतीय मोटार कामगार संघाचे सक्रिय कार्यकर्ते, मातृसेवा पतसंस्थेचे संचालक, वर्धा नागरी बँकेच्या स्थानिक समितीचे सदस्य असलेले व्यक्तिमत्व होते.



निरोप समारंभात आगाराचे व्यवस्थापक सुरज बोबडे यांच्या अध्यक्षतेखाली बसस्थानक प्रमुख विनोद खंडार, कार्यशाळा अधिक्षक शुभम खडतकर, सेवानिवृत्त कर्मचारी ममोका फेडरेशन प्रादेशिक सचिव प्रमोद बमनोटे, कामगार प्रतिनिधी मधुकर शिवनकर, वासनिक, सत्यनारायण वर्मा, सरदार देवळे, प्रफुल ऊपासे, पराग वडाळकर आदींनी विजय भांडे यांच्या कार्याबद्दल विचार मांडले आणि भावी आयुष्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

विजय भांडे यांच्या वर्तणुकीबद्दल वक्त्यांनी नमूद केले की, त्यांची प्रवासी व कर्मचारी यांच्यात समन्वय साधणारी व सौजन्यपूर्ण व आपुलकीची नाती होती. त्यांचे योगदान सर्व कर्मचारी बंधु भगिनींशी स्नेहपूर्ण संबंध निर्माण करण्यात महत्त्वपूर्ण होते.

कार्यक्रमाचे संचालन सुचिता सुरकार यांनी केले. याप्रसंगी भांडे यांच्या पत्नी अपर्णा, मुली कल्याणी, पूजा आणि आरती देखील उपस्थित होत्या. कर्मचाऱ्यांच्या वतीने विजय भांडे आणि अपर्णा भांडे यांचा शाल, श्रिफळ आणि भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. सर्व कर्मचाऱ्यांसाठी विजय भांडे यांनी जेवणाची व्यवस्था केली होती. जेवणानंतर त्यांना निरोप देण्यात आला.

# मतदार नोंदणीची उत्कृष्ट कामगिरी प्रशासनाच्या वतीने सन्मानित

## विद्यानिकेतचे प्रविण आस्वले यांचे कौतुकास्पद कार्याची दाखल

**यवतमाळ । प्रतिनिधी**

भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी , भारतीय संविधान लागू होण्याच्या एक दिवस आधी करण्यात आली . कारण भारत २६ जानेवारी १९५० रोजी प्रजासत्ताक बनणार होता . या दिवशी भारतातील प्रत्येक नागरिकाने आपल्या राष्ट्राच्या प्रत्येक निवडणुकीत सहभागी होण्याची शपथ घेतली पाहिजे . कारण भारतातील प्रत्येक व्यक्तीचे मत देशाच्या भविष्याचा पाया घालते .भारतात दरवर्षी २५जानेवारीला राष्ट्रीय मतदार दिन साजरा केला जातो . हा दिवस प्रत्येक नागरिकासाठी महत्वाचा आहे . भारतातील राष्ट्रीय मतदार दिन दरवर्षी २५ जानेवारी रोजी भारतीय निवडणूक आयोगाचा स्थापना दिवस म्हणून साजरा केला जातो . अधिक तरुण मतदारांना राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी भारत



सरकारने याची स्थापना केली होती आणि पहिल्यांदा २५ जानेवारी २०११ रोजी साजरा करण्यात आला . तेव्हापासून यात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा सन्मान करण्यात येतो.

यवतमाळ जिल्ह्यातील

स्थानिक मारेगाव येथिल विद्यानिकेतन इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स मारेगाव येथे कार्यरत असलेले प्रवीण मनोहर आस्वले यांनी मतदार जनजागृती मोहिमेत उल्लेखनीय कार्य केले त्याबद्दल त्यांचा पंधराव्या राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून प्रजासत्ताक दिनी उपविभागीय अधिकारी नितीन कुमार हिंगोले यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला, त्यांचे यशाबद्दल संस्था अध्यक्ष्या संध्या पोटे, सचिव राजेश पोटे, मुख्याध्यापिका ज्योत्सना बोंडे , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंदाने अभिनंदन केले.

# रथसप्तमी निमित्त मातंग समाजातील महिलां साठी हळदी-कुंकू व वाण कार्यक्रम संपन्न

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

रथसप्तमीच्या मुहूर्तावर मातंग समाजातील महिलांसाठी हळदी-कुंकू व वाण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आद्य क्रांतिगुरू लहुजी साळवे बहुउद्देशीय सांस्कृतिक मंडळ, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सभागृह समिती गौतम वार्ड, राष्ट्र सेविका समिती हिंगणघाट आणि महिला समन्वय हिंगणघाट यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सभागृह, आंबेडकर चौक, हिंगणघाट येथे पार पडला.



कार्यक्रमात हळदी-कुंकवाच्या महत्त्वासोबतच महिलांची समाजातील भूमिका, जागृती आणि कुटुंबाच्या प्रगतीतील योगदानावर विचार मांडण्यात आले. तसेच लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत, महिलांनी समाजोपयोगी कार्यात अधिक सक्रीय होण्याचा निर्धार केला.कार्यक्रमास राष्ट्र सेविका समितीच्या सविताताई धारकर, गायत्रीताई धारकर, अपर्णाताई धारकर, सुरपाम, मानापुरे, मोहता, खेतल, देशपांडे, दमानी तसेच महिला समन्वय हिंगणघाटच्या कार्यकर्त्या आणि आद्य क्रांतिगुरू लहुजी साळवे बहुउद्देशीय सांस्कृतिक महिला मंडळाच्या अमृताताई खंदार, प्रियाताई पोटफोडे, मंगलाबाई शेंडे, लताबाई खडसे, सोनल तायवडे यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमात १५० महिलांनी सहभाग घेतला, तसेच गौतम वार्ड समितीचे अध्यक्ष ईशान खंदार, अनिल पोटफोडे, आदर्श शेंडे, राहुल बंगाले, अनिकेत शेंडे, प्रवीण खोके, अंश खडसे, अनिकेत निखाडे, चिराग करणे, नंदकिशोर खंदार, शशांक खंदार, सोहम खडसे, नोमित कांबळे, ध्रुव निखाडे व समाज बांधवांच्या संयोजनाने कार्यक्रम पार पडला.कार्यक्रमाच्या शेवटी महिलांनी एकमेकांना हळदी-कुंकू लावून वाण दिले, तसेच तिळगुळाचे वाटप करून समाज एकत्रित ठेवण्याचा संदेश दिला. उपस्थितांनी समाजोपयोगी कार्य करण्याचा संकल्प घेत कार्यक्रमाची सांगता झाली.

# आर.के.ज्ञान मंदिरम येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात साजरा

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक आर. के. ज्ञानमंदिरम इंग्लिश मिडियम स्कुल येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ यशोत्कर्ष - 'द कलमीनेशन ऑफ सक्सेस' मोठ्या उत्साहात व थाटामाटात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरवात विद्येची आराध्य देवता माता सरस्वती व आर. के. हायस्कुल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय रंगलालजी केजडीवाल यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून गणेश इंगळे, प्राचार्य, आर. के. हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, नूरसिंग जाधव, मुख्य समन्वयक, आर. के. हायस्कूल ट्रस्ट, राहुल सोनवणे, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, पुलगाव, आनंद जीवने, उपमुख्याध्यापक, आर. के. हायस्कूल, सुनील भोयर, उपप्राचार्य आर. के. हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, गणेश शर्मा, पर्यवेक्षक, आर. के. मिडल स्कुल आणि आर. के. ज्ञानमंदिरमचे प्राचार्य नितीन श्रीवास,




पर्यवेक्षिका प्रीती बिडकर व पर्यवेक्षिका प्रणिता कोंबे उपस्थित होते.

कार्यक्रमात दहावीच्या वर्ग शिक्षक, सर्व विषय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे पुष्पगुच्छ, शुभेच्छा पत्र व भेटवस्तू देऊन स्वागत करण्यात आले. समाजशास्त्र शिक्षिका अमृता माहोरे व विज्ञान शिक्षिका शुभांगी शेळके यांनी यादें याद आती हैं हे गीत सादर केले. इयत्ता दहावीचा विद्यार्थी सुरमय खांडेकर याने मैत्रीवर आधारित सुंदर गीत सादर केले. इयत्ता दहावीच्या काही विद्यार्थ्यांनी शालेय आठवणींना उजाळा देत त्यांचे शाळेप्रति प्रेम, समर्पण व शिक्षकांप्रति आदर व्यक्त केला. प्राचार्य गणेश इंगळे, मुख्य समन्वयक नुरसिंग जाधव, आर. के. ज्ञानमंदिरमचे प्राचार्य नितिन श्रीवास, उपप्राचार्य सुनील भोयर, पर्यवेक्षक गणेश शर्मा आणि पोलीस निरीक्षक राहुल सोनवणे यांनी सर्व विद्यार्थ्यांना दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेकरिता हार्दिक शुभेच्छा दिल्या आणि उत्तम मार्गदर्शन केले. आर.के. हायस्कूल ट्रस्टचे अध्यक्ष हरीप्रकाशजी केजरीवाल, आर. के. शाळा समितीचे अध्यक्ष व विश्वस्त रंजनकुमारजी केजरीवाल, तसेच वरिष्ठ विश्वस्त द्वारकादासजी दरक यांनी देखील विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता नववी (अ) च्या विद्यार्थिनी भविका ढगे आणि इयत्ता नववी (ब) चा विद्यार्थी प्रीत हावरे यांनी केले. आभार प्रदर्शन इयत्ता नववी (ब) च्या विद्यार्थिनी यशिका खेरडे हिने केले. या प्रसंगी स्वादिष्ट भोजनाची व्यवस्था करण्यात आली, ज्याचा सर्वांनी आनंद घेतला. कार्यक्रमाचे आयोजन आर. के. शाळा समितीचे अध्यक्ष रंजनकुमारजी केजरीवाल यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शाळेचे प्राचार्य नितिन श्रीवास यांच्या नेतृत्वात करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षक गणेश शर्मा, पर्यवेक्षिका प्रीती बिडकर, प्रणिता कोंबे, सांस्कृतिक विभाग, आयोजन समिती, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचा शेवट राष्ट्रगीताने करण्यात आला.

# अहिल्यानगर-कोपरगाव डबल रेल्वे लाईन : लवकरच होणार हा निर्णय



**अहिल्यानगर । शहाजी दिघे**

मार्च अखेरपर्यंत राहुरी वांबोरी हा टप्पा पूर्ण झाल्यास मनमाड ते निंबळक हे १५४ किमी अंतर दुहेरीकरण विद्युतूकरणासहित पूर्ण होईल. बहुचर्चित व महत्त्वाकांक्षी अशा दौंड मनमाड रेल्वे मार्गावरील डबल लाईनचे काम सध्या वेगाने सुरू असून राहुरी ते वांबोरी या चौदा किलोमीटर अंतरावरील डबल लाईनचे काम रुळ बसवण्याचे काम सुरू आहे . रेल्वे मार्गातील वांबोरी विभागात ओवर हेड वायर्स नियमित सुरू होत आहे . २८ फेब्रुवारी २०२५ पासून इलेक्ट्रिक कर्षणाची सुरुवात २५ केली एसी किलोमीटर ३७७. ५०० पासून किलोमीटर ३९१. ०० पर्यंत म्हणजेच साडेतेरा किलोमीटर सुरू होणार आहे .या दरम्यान लोडिंगची वाहने उंचीचे निरीक्षण करून वाहनांवरील भार उंची मापकांचे उल्लंघन होणार नाही व ओवर हेड वायरच्या संपर्कात येणार नाही याची खात्री करावी , असे आवाहन मध्य रेल्वेने नुकतेच जाहीर निवेदनाद्वारे केले आहे नगर ते मनमाड डबल लाईन रेल्वेमार्ग प्रकल्पातंर्गत पढेगाव ते राहुरी या १४ कि.मी. अंतराची चाचणी मागील दोन महिन्यांपूर्वी घेण्यात आली. नगर ते मनमाड रेल्वे मार्गाचे काम लवकरच पुर्ण होणार असून नगरचा रेल्वे प्रवास सुपरफास्ट होणार आहे. पुर्ण रेल्वेमार्गात इलेक्ट्रीक इंजीनचा वापर होत आहे. गेल्या तीन वर्षापासुन नगर ते मनमाड द्रुतगती (डबललाईन) रेल्वे मार्गाचे काम सुरू आहे. मनमाड - कोपरगाव - नगर - दौंड या मार्गावर राहुरी रेल्वे स्टेशन महत्त्वाचे मानले जाते . या रेल्वे स्टेशनवर बाहेरील राज्यातील सुपरफास्ट तसेच पॅसेंजर व अन्य एक्सप्रेस रेल्वे गाड्यांचा थांबा व्हावा , अशी मागणी साई भक्त व शनि भक्तांकडून सातत्याने होत आहे . मात्र राजकीय अपरिपक्वतीमुळे या महत्त्वाच्या बाबींकडे नेहमीच टाळाटाळ होत आलेली आहे . या पुर्वी कोपरगाव ते येवला व येवला ते अंकाई, अंकाई ते अंकाई किल्ला, अंकाई किल्ला ते मनमाड, कोपरगाव ते कान्हेगाव, बेलापूर ते पुणतांबा, बेलापूर ते पढेगाव, निबळक ते वांबोरी, पुणतांबा ते कान्हेगाव या मार्गाची यशस्वी चाचणी घेण्यात आली. यापूर्वी १४ कि.मी. डबल लाईन रेल्वे मार्गाची चाचणी घेण्यात आली. आता एकूण १३५ की. मी. अंतराची चाचणी पूर्ण घेतली आहे. मनमाड ते दौंड रेल्वे मार्गात नगरच्या रेल्वे स्थानकाचा महत्वपुर्ण टप्पा येतो. मात्र हा मार्ग सिंगल लाईन असल्यामुळे रेल्वेगाडीचा वेग कमी होता. तसेच सिंगल लाईनमुळे अनेकदा रेल्वे गाड्यांना थांबा घ्यावा लागत होता. तासनतास रेल्वे गाडी एकाच जाग्यावर थांबुन ठेवावी लागत. मात्र आता हा पुर्ण मार्ग इलेक्ट्रीक इंजीनचा वापर करून डबल लाईन करण्यात येत असल्यामुळे विनाकारण रेल्वेगाडयांचा थांबा आता बंद होणार आहे. तसेच या कामामुळे रेल्वे ताशी १३० प्रति किमी वेगाने धावणार असल्याने, रेल्वेगाडी धावण्याचा वेगही सुपरफास्ट होणार आहे. तीन वर्षापासुन हे काम सुरू आहे.

पहिल्या टप्प्यात नगर ते मनमाड व दुसऱ्या टप्प्यात नगर ते दौंड पर्यंत काम पुर्ण होणार आहे. नगर ते मनमाड पर्यतंचा टप्पा पुर्ण होण्यास अजुन एक वर्ष लागतील असा अंदाज आहे. ताशी १३० वेगाने धावली रेल्वे या अधिकाऱ्यांच्या उपस्थीतीत पढेगाव ते राहुरी द्रुतगती लोहमार्गाच्या चाचणीसाठी घेण्यात आली आहे.

## मनोज खोडे यांच्या सेवा निवृत्ती बद्दल सत्कार करण्यात आला



**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक नगरपरिषदेचे स्वच्छता निरीक्षक मनोज खोडे यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार करण्यात आला. नगर पालिका सभागृहात आयोजित कार्यक्रमात मुख्याधिकारी विजयकुमार आश्रमा, अखिल भारतीय सफाई कामगार संघटनेचे राष्ट्रीय सरचिटणीस जयसिंग कच्छवाह आदी प्रमुख उपस्थित होते. . नगर परिषदेच्या वतीने आरोग्य निरीक्षक मनोज खोडे यांचा शाल, श्रीफळ, भेटवस्तू व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. त्या वेळी माजी नगराध्यक्ष शालवंती दाबोडे माजी नगरसेवक संजय दाबोडे उपस्थित होते प्रास्ताविक प्रशासकीय अधिकारी विकास गावडे व संचालन स्वच्छता लिपिक संजय वानखडे यांनी केले. यशस्वीतेसाठी लिपिक अभियंता रूपेश नवलाखे,विजय नाईक सुनील मलिक,,अविनाश जायदे सोनम मैडम, मारोती हनोडे,खरडे सर अनिल रानवे, भरत गोयर, अंकुश मांजरे, पंकज चावरे, आकाश खोडे, राहुल सांगळे,नरेश येदबान आदी कर्मचारी उपस्थित होते.

## आमदार राजेश बकाणे यांच्या वाढदिवसा निमित्त भव्य नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन द ग्रेट खली यांची राहणार उपस्थिती

**देवळी । प्रतिनिधी**

देवळी विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार राजेश बकाणे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून नागरी सत्कार समिती देवळी पुलगाव विधानसभा च्या माध्यमातून नागरिक सत्काराचे आयोजन दिनांक ७ फरवरी रोज शुक्रवारला दुपारी २ वाजता खासदार रामदासजी तडस इनडोअर स्टेडियम देवळी येथे आयोजित करण्यात आला आहे.



या कार्यक्रमात माननीय चंद्रशेखर बावनकुळे महसूल मंत्री तथा प्रदेश अध्यक्ष भाजपा डॉ. पंकज भोयर राज्यमंत्री तथा पालकमंत्री वर्धा जिल्हा, आमदार राजेशजी बकाणे देवळी, आमदार समीरजी कुणावार हिंगणघाट, आमदार सुमित वानखेडे आर्वी, डॉ. प्रमोद गिरी संचालक न्यूरॉन हॉस्पिटल नागपूर यांचा भव्य नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार रामदासजी तडस हे राहणार आहे या नागरी सत्कारा करिता विशेष आकर्षण म्हणून द ग्रेट खली थथऋ कुस्तीगीर हे प्रथमच देवळी शहरात येत आहे.

तसेच प्रमुख अतिथी म्हणून सुनील गपाट जिल्हाध्यक्ष भाजपा, सुरेश वाघमारे माजी खासदार, दादारावजी केचे माजी आमदार आर्वी, सागर भाऊ मेघे माजी आमदार, मा. वान्मथी सी. जिल्हाधिकारी वर्धा, अनुराग जैन पोलीस अधीक्षक वर्धा, मा. जतिन रहमान मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वर्धा, हरवीर सिंह जिल्हा वन सरक्षक वर्धा हे उपस्थित राहणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात दुपारी दोन वाजता नागपूर येथील सुप्रसिद्ध आर्केस्ट्रा ने होईल तसेच सोबत डान्स ग्रुपच्या माध्यमातून नृत्याचे सादरीकरण होईल. सर्व प्रमुख अतिथी येताच भव्य नागरिक सत्काराच्या मुख्य कार्यक्रमाची सुरुवात केली जाईल. जागतिक दर्जाचे कुस्तीगीर द ग्रेट खली दुपारी ठीक दोन वाजता इनडोअर स्टेडियम देवळी येथे पोहोचतील या कार्यक्रमाचे आयोजन देवळी पुलगाव विधानसभा क्षेत्रातील नागरी सत्कार समितीच्या माध्यमातून करण्यात आले आहे. विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक भागातून नागरीक या कार्यक्रमात सहभागी होणार आहे. अशी माहिती माजी खासदार रामदासजी तडस, राहुल चोपडा वर्धा जिल्हा चिटणीस भाजपा यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून दिली.

पत्रकार परिषदेला सर्व वृत्तपत्राचे वार्ताहर व माजी खासदार रामदाजी तडस राहुलजी चोपडा वर्धा जिल्हा भाजपा चिटणीस, बंडूभाऊ जोशी माजी नगरसेवक, संतोष भोयर भाजपा जिल्हा कार्यकारिणी, रवि कारोटकर शहर भाजपा, विनायकराव भोयर, मुरली तपासे,निलेश कसणारे, किरण तेलरांधे, हेमंत जावंधिया यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

## १२ वे अ.भा.मराठी शेतकरी साहित्य संमेलन जयसिंगपूर येथे;सरोजताई काशीकर संमेलनाध्यक्ष











**वर्धा । राहुल मुन**

शेतकऱ्यांच्या जीवनातील वास्तवाला साहित्याच्या केंद्रस्थानी आणण्यासाठी आणि नव्या पिढीतील साहित्यिकांना शेतीविषयक भान देण्यासाठी १२ वे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन जयसिंगपूर येथे आयोजित करण्यात आले आहे. शनिवार, दि. ८ आणि रविवार, दि. ९ फेब्रुवारी २०२५ रोजी युगात्मा शरद जोशी विद्यानगरी, सहकारमहर्षी शामराव पाटील यड्रावकर नाट्यगृह येथे हे संमेलन होणार आहे.या संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ शेतकरी नेत्या, माजी आमदार तथा लेखिका सरोजताई काशीकर यांची निवड करण्यात आली असून, उदघाटन माजी संसदपटू आमदार तथा ज्येष्ठ शेतकरी नेते ॲड. वामनराव चटप यांच्या हस्ते होणार आहे. विधानसभा सदस्य राजेंद्र पाटील यड्रावकर हे स्वागताध्यक्ष असतील, तर शेतकरी साहित्य चळवळीचे संस्थापक अध्यक्ष गंगाधर मुटे कार्याध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळतील. संयोजक म्हणून मुंबई उच्च न्यायालयाचे ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सतीश बोरुळकर काम पाहणार आहेत.

शेतकऱ्यांच्या समस्या, शेतीचे अर्थशास्त्र, नवनवीन तंत्रज्ञान आणि शेतीच्या भविष्यावर केंद्रित विविध परिसंवाद, शेतकरी कवी संमेलन, गझल मुशायरा, कथाकथन आदी सत्रांचे आयोजन या संमेलनात करण्यात आले आहे. संमेलनाच्या तयारीसाठी विविध समित्या गठीत करण्यात आल्या असून, राज्यभरातून साहित्यिक, अभ्यासक, शेतकरी नेते आणि रसिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

गेल्या काही वर्षांत शेतीतील वाढती संकटे, शेतमालाचे कोसळणारे भाव आणि शेतकरी आत्महत्यांचे वाढते प्रमाण यामुळे शेती व्यवसाय अडचणीत आला आहे. मात्र, या गंभीर परिस्थितीचे प्रतिबिंब साहित्य क्षेत्रात प्रभावीपणे उमटलेले नाही. या पार्श्वभूमीवर, शेतकरी साहित्य चळवळ शेतकऱ्यांच्या व्यथा, संघर्ष आणि आशा-अपेक्षा यांना वाचा फोडण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.२०१५ मध्ये वर्धा येथे सुरू झालेल्या या संमेलनाचे यंदाचे बारावे वर्ष आहे. गेल्या १० वर्षांत नागपूर, गडचिरोली, मुंबई, औरंगाबाद (पैठण), रायगड (अलिबाग), यवतमाळ (रावेरी), अमरावती (गुरुकुंज आश्रम) आणि नाशिक (मोहाडी) येथे हे संमेलन यशस्वीरीत्या पार पडले आहे. यंदाचे संमेलन साहित्यिकांना केवळ कल्पनाविलासापुरते न ठेवता शेती आणि ग्रामीण भारताच्या वास्तवाशी त्यांची नाळ जोडण्यासाठी प्रेरणादायी ठरणार आहे.शेतीप्रेमी साहित्यिक आणि रसिकांनी या संमेलनाला उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## सराफा दाम्पत्य आणि सासूवर ९७ ग्रॅम सोन्याच्या फसवणुकी प्रकरणी गुन्हा दाखल

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

वरोरा येथील महिलेची तब्बल ९७ ग्रॅम सोन्याची फसवणूक केल्याप्रकरणी चंद्रपूरच्या सराफा व्यवसायिक दाम्पत्यासह त्यांच्या सासूवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी रूविदा रोहीत वाढई (रा. टिळक वॉर्ड, वरोरा) यांच्या तक्रारीवरून रिया सुरज सोनी, सुरज शिवकुमार सोनी आणि भारती शिवकुमार सोनी (सर्व रा. सराफा लाईन, गांधी चौक, चंद्रपूर) यांच्या विरोधात भादंवि कलम ४२०, ४०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



फिर्यादी आणि आरोपी रिया सोनी या शालेय जीवनातील वर्गमैत्रिणी असून २०१९ मध्ये रियाने संपर्क साधून मैत्री वाढवली. पुढे मार्च २०२० मध्ये व्याजाने पैसे देण्याचे सांगून फिर्यादीकडून ५०,००० रुपये घेतले आणि नियमित व्याज देऊन विश्वास संपादन केला. त्यानंतर मे २०२० मध्ये कोरोना लॉकडाऊनमुळे अडचणीत असलेल्या फिर्यादीला रियाने सोनं गहाण ठेवण्याचा सल्ला दिला.

२४ मे २०२० रोजी रिया सोनी, तिचा पती सुरज सोनी आणि सासू भारती सोनी हे वरोरा येथे फिर्यादीच्या घरी आले. त्यांनी सोनं गहाण ठेवून पैसे देण्याचे आश्वासन दिले. त्यावर विश्वास ठेवून फिर्यादीने ९७ ग्रॅम सोन्याचे दागिने (एकूण किंमत ६,५५,००० रुपये) आरोपींना दिले. मात्र, त्याऐवजी आरोपींनी काही चेक दिले, जे बँकेत वटलेच नाहीत.

सोन्याच्या बदल्यात पैसे देण्याचे वारंवार आश्वासन देऊन आरोपींनी टाळाटाळ सुरू केली. फिर्यादी व तिच्या पतीने पैसे मागण्यासाठी चंद्रपूरच्या सराफा दुकानात भेट दिली, पण प्रत्येकवेळी वेगवेगळी कारणं सांगून त्यांना रिकाम्या हाताने परत पाठवण्यात आलं. मार्च २०२२ मध्ये दिलेले चेकही वटले नाहीत, आणि अखेरीस आरोपींनी त्याचा नाद सोडावा असा इशाराही दिला.

दीड वर्षाच्या संघर्षानंतर फिर्यादीने वरोरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. चौकशीत आरोपींनी संगनमत करून विश्वासघात केल्याचे स्पष्ट झाल्याने त्यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर प्रकरणाचा तपास पोलिस उपविभागीय अधिकारी नयोमी साटम, पोलिस निरीक्षक अजिंक्य तांबडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक अनिल मेश्राम करत आहेत.

## खमारी येथे श्रीमद् भागवत सप्ताह यशस्वी

**भंडारा । प्रतिनिधी**

श्री. सार्वजनिक हनुमान मंदिर देवस्थान समिती खमारी (बुटी) व समस्त ग्रामवासी यांच्या संयुक्त सहकार्याने सात दिवशीय कथामृत संगितमय श्रीमद् भागवत सप्ताह वैनगंगेतीरी श्री सार्वजनिक हनुमान मंदिर खमारी (बुटी) च्या प्रांगणात नुकताच यशस्वी पार पाडण्यात आला.

श्री महाविर हनुमान मुर्तीचे अभिषेक आणि श्रीमद् भागवत अधिष्ठानाची स्थापना तसेच उद्घाटन आदर्श शेतकरी बाबुराव मोहरकर व सहउद्घाटन सदाशिव किनारकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच नलिनी काळे होत्या. प्रवचनकार ह.भ.प. ईश्वरानंद गिऱ्हेपुंजे महाराज, प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद सदस्य रजनिस बन्सोड, उपसरपंच आशिष लांजेवार, ग्राम पंचायत सदस्य गिरधारी मेश्राम, जयश्री समरित, मेघा शनवारे, मंगला मडामे, ललिता समरित, दीपमाला फेंडर, भंडारा जिल्हा पत संघाचे संचालक अज्ञान राघोर्ते, माजी सैनिक महादेव पेशने, ओमप्रकाश मडामे, माजी पंचायत समिती सदस्य डॉ. सचिन निंबार्ते, परमात्मा एक सेवक कार्यकर्ता झिबल ठवकर, अशोक फेंडर, उत्तम ठवकर, बबन भोयर आणि समस्त ग्रामवासी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.भागवत सप्ताह निमित्त भागवत प्रवचन, दररोज रामधुन, हरिपाठ तसेच शोभायात्रा व जागृती करण्यात आली. श्रीमद भागवत कथामृत संगितमय विठ्ठल अवतार कथा प्रवचनकार ह.भ.प. ईश्वरानंद गिऱ्हेपुंजे महाराज यांच्या ओजस्वी वाणीतून प्रवचन व



सहयोगी करण्यात आले.दहीहंडी तसेच महाप्रसाद कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी उपसरपंच राजू मोटघरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून म्हणून सेवानिवृत्त वैद्यकीय डॉ. पी. एस. डोंगरवार, सामाजिक कार्यकर्ते विनायक गभणे, प्रतिष्ठित शेतकरी बाबुराव मोहरकर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक मुरलीधर पवनकर, सुरेश फेंडर, के. एन. पवनकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतीय आट्यापाट्या संघाची कर्णधार तथा स्वर्णपदक विजेती प्राची केशव चटप हीचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह त्याच प्रमाणे उपस्थितांचा सुध्दा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते दहीहंडी होडून गोपाल काला व महाप्रसाद वितरण करण्यात आला. त्यावेळी परिसरातील भाविक भक्त, बांधव व नागरिकांनी जास्तीत - जास्त संख्येने अखंड हरिनाम सप्ताह व महाप्रसाद वितरणाचा लाभ घेतला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दिनेश फेंडर व प्रास्ताविक सचिव सत्यानंद रेहपाडे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार विलास केजरकर यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता श्री सार्वजनिक हनुमान मंदिर देवस्थान समितीचे अध्यक्ष खुशाल शहारे, उपाध्यक्ष वामन नागपुरे, सचिव सत्यानंद रेहपाडे, सेवक बोरकर, गजाननजी पेशने, माणिक समरीत, बालाराम पवनकर, सुनिल फेंडर, संजय किनारकर, महेश काळे, संजय केजरकर, चंद्रभान हरडे, दिलशान मोहरकर, प्रभाकर अहिरकर, नानाजी फेंडर, सुखदेव धांडे, विठ्ठल मोहरकर, शशिकला बोरकर, यशोदा मोहतुरे, राजू शेंडे, विरांगणा पडोळे, विलास मने, नरेश समरित, महेश शहारे, भाऊदास मेश्राम, लुटारू फेंडर, शाहु ठवकर, भाऊराव बोरकर, भोला मेश्राम, उपासराव शनवारे, कमलाबाई रेहपाडे, राजकुमार उदाराम मारवाडे, शांताबाई मोहरकर, मंजुळाबाई पवनकर, मंदाबाई रेहपाडे, जयश्री वाघाये, पडोळे, श्री सार्वजनिक हनुमान मंदिर देवस्थान समितीचे पदाधिकारी व खमारी ग्रामवासीयांनी केले आहे.